**विशेष लेख क्र.१४४** ७ भाद्रपद १९२९ शके (सायं.५.३० वा.)
(लेख ४ था) बुधवार, दि. २९ ऑगस्ट २००७

## महिलांना दिलासा देणाऱ्या शासनाच्या निवास व्यवस्था

राज्य शासन महिलांच्या सामाजिक सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या आर्थिक उन्नतीलाही महत्त्व देत आहे, त्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवित आहे. अनेकदा विविध कारणांनी महिलांना आपलं राहतं घर सोडावं लागतं, अशावेळी तिला कुठेतरी तात्पुरती, अल्पकाळासाठीची निवास व्यवस्था हवी असते. याप्रमाणेच नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने घरापासून दूर राहण्याची गरज असते, तेंव्हा तिच्या सुरक्षित निवाऱ्याची किंवा निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याची गरज असते. या सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या दोन योजना आहेत. एक म्हणजे अल्पमुदती निवासगृहे आणि दुसरी नोकरी करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृहे. या दोन्ही योजना केंद्र पुरस्कृत आहेत.

मानसिक तणाव, सामाजिक आणि नैतिकदृष्टया संकटात सापडलेल्या स्त्रिया, लैंगिकदृष्टया शोषित स्त्रिया, निराधार, घटस्फोटित महिलांना निवासस्थानात आधार देण्यासाठी केंद्रसरकारने अल्पमुदती निवास योजना सुरू केली आहे. या महिलांना येथे वैद्यकीय उपचाराबरोबरच मानसोपचार, समुपदेशन, व्यवसाय प्रशिक्षणाबरोबरच खेळ आणि मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. अशा महिलांचे पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने स्वयंसेवी संस्थांमार्फत अल्पमुदती निवासगृहे चालवली जातात.

या योजनेमध्ये ३० महिलांकरिता ५० हजार रुपयांचे अनावर्ती, ४,०२,३५० रुपयांचे आवर्ती अनुदान स्वयंसेवी संस्थेस दिले जाते.

या योजनेअंतर्गत राज्यात २८ अल्पमुदती निवासगृहे आहेत. त्यांची क्षमता ८४० इतकी आहे. नवी दिल्लीत एक अल्पमुदती निवासगृह असून, मुंबईत एक, ठाण्यात एक, रत्नागिरीत एक, पुण्यात दोन, सांगलीत एक, नाशिकमध्ये एक, धुळयात एक, नंदूरबारमध्ये एक, अहमदनगरमध्ये एक, अकोल्यात एक बुलढाण्यामध्ये एक, नागपुरात तीन, चंद्रपुरमध्ये दोन, गडचिरोलीमध्ये दोन, जालनामध्ये एक, बीडमध्ये एक, नांदेड आणि लातुरमध्ये प्रत्येकी तीन आहेत.

अल्पमुदती निवासगृहांसाठी राज्यशासनाने यवतमाळ, बीड, पुणे, वाशिम, कोल्हापूर, नागपूर, लातूर, अहमदनगर, उस्मानाबाद, अकोला, आणि हिंगोली जिल्ह्यांचे एकूण १७ प्रस्ताव केंद्रसरकारकडे मान्यतेसाठी सादर केले आहेत.

...२/

अल्पमुदती निवासगृहांप्रमाणेच नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहाची योजनादेखील अतिशय उपयुक्त आहे. ही योजनाही केंद्रपुरस्कृत आहे. घरापासून दूर, बाहेरगावी नोकरी करणाऱ्या महिलांची राहण्याची सोय करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोकरी करणाऱ्या महिलेचे मासिक उत्पन्न हे १६ हजार रुपयांपेक्षा जास्त असता कामा नये. ही योजनाही स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येते.

या योजनेमध्ये स्वंयसेवी संस्थेला इमारत बांधकामाच्या एकूण खर्चाच्या ७५ टक्के रक्कम केंद्रसरकारकडून अनुदानाच्या स्वरूपात हप्त्या हप्त्याने दिली जाते. जागा खरेदीसाठी जागेच्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर केंद्राकडून दिली जाते. या वसतिगृहात केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या दराने निवास शुल्क आकारण्यात येते.

या योजनेअंतर्गत राज्यात १२७ संस्था कार्यरत असून त्यांची क्षमता ९,१७२ इतकी आहे. यामध्ये मुंबईमधील अशा वसतीगृहांची संख्या १७ आहे. तर ठाणे जिल्ह्यात ५ वसतिगृह आहेत. चिपळूण, रत्नागिरी, रायगड, सिंधुदूर्ग जिल्ह्यात प्रत्येकी १, पुण्यात १३, सातारा येथे ३, सांगली २, सोलापूर १, कोल्हापूर ४, नाशिक ५, धुळे ४, नंदूरबार २, जळगाव ५, अहमदनगर ११, अमरावती ८ , अकोला २, यवतमाळ ३, बुलढाणा २, नागपूर १०, वर्धा २, भंडारा १, चंद्रपूर ३, गडचिरोली १, औरंगाबाद ४, जालना २, परभणी ३, हिंगोली १, बीड १, नांदेड ३, उस्मानाबाद १, लातूर ४ अशी वसतिगृहांची संख्या आहे. याव्यतिरिक्त शासनाने आणखी १२ प्रस्ताव केंद्राकडे मंजुरीसाठी पाठवले आहेत.

या दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्याकडे किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार बोर्ड, मुंबई यांच्याकडे तसेच सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्याकडे यासाठी संपर्क साधता येईल.

अडचणीच्या काळातच नाही तर नोकरी करण्याच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या महिलांच्या निवासाचा प्रश्न सोडविणाऱ्या या योजना निश्चितच महिलांना दिलासा देणाऱ्या आहेत.

**-- डॉ. सुरेखा मुळे**
वरिष्ठ सहाय्यक संचालक, माहिती

oooooooo